REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 10 | JULY - 2017

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची बहुआयामी पत्रकारिता




**डॉ.संजय गायकवाड**
**मा.ह.महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.**

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे दलिताचे आराध्य दैवत, आणि देशातील जे जे प्रामाणित आहेत त्याचे शाश्वत प्रतिक आहेत. राष्ट्र, देश या संकल्पनेपेक्षा शोषित लोक व त्यांचे कल्याण या बाबी त्यांना महत्वाच्या वाटतात. शोषित वर्गाला दुर्लक्षित करण्याचे व त्यांना मूर्ख बनविण्याचा सर्वात कार्यक्षम म्हणजे राष्ट्रवाद. लोकांच्या जीवन अनुभवातून भौतिक पाया पुरवला जाऊ शकतो. तोच केवळ राष्ट्र व राष्ट्रवादाचा खरा आधार ठरु शकतो. त्यांनी व्यवहार्य परिस्थितीतील राष्ट्रवाद संकल्पनेत स्वातंत्र्य, समता, बंधुता, या विश्वसंकल्पनाच्या दिव्य दृष्टीचा उदात्त दृष्टिकोन मांडला आहे. मैत्री आणि बंधुभाव या सदभावनाची धारणा केल्याशिवाय अल्पसंख्याक, दुबळया अज्ञानी समाजाला न्याय व आत्मबळ मिळणार नाही. त्याला न्याय संरक्षण मिळाल्याशिवाय त्यांच्या मनात समाजाबददल व देशाबद्दल व प्रशासनाबद्दल आदर वाढणार नाही. म्हणून समाजात माणुसकीची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. मैत्री आणि बंधुभाव या संकल्पनेचे सामाजिकीकरण होणे आगत्याचे आहे. मानवतावादामुळेच समाजाचा विकास व राष्ट्र उभारणी होऊ शकेल असा ठाम विश्वास त्यांना होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष तत्वाचा तसेच सामाजिक न्याय समता स्वातंत्र्य व संधी समानतेचा आणि बंधुतेचा पुरस्कार राज्यघटनेद्वारे करुन समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना आपल्या पत्रकारितेचा उपयोग करुन घेतला. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समस्त मानव जातीचे खऱ्या अर्थाने नायकच राहणार आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपाधी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार , कायदेपंडित एक संशोधक राष्ट्रभक्त, तत्वचिंतक राजकारणी, शिक्षणतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, भाषा पंडित, संयुक्त महाराष्ट्राचे समर्थक, छोटी राज्ये असावीत असे आवर्जून सांगणारे दृष्टे, उत्तरेकडील सर्व नदया वळवण्याची योजना सादर करणारे जलतज्ञ, कुशल संपादक, महान लेखक, शिका , संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा जगविण्याचा आणि जागृतीचा मंत्र देणारे युगप्रवर्तक, बौध्द धर्माचे युगप्रवर्तक, जगाचे युगपुरुष, आपल्या विचारांनी व कार्यानी जीवनाला नवे वळण लावून आपली मुद्रा जगाच्या पाठीवर उमटवून नवयुग निर्माण करणारे महामानव होते.

"शेकडो फुलांच्या सुंगधाचा अर्क, अत्तरांच्या एका थेंबात साठवलेला असतो. तसेच लाखो पृष्ठांचे तत्वज्ञानी विचार एका महामानवात साठवलेले आहेत. "

**पत्रकारितेची पार्श्वभूमी :** सामाजिक बांधीलकी सांभाळण्याची जबाबदारी वृत्तपत्रावर होती या काळात केसरी, इंदुप्रकाश , ज्ञानप्रकाश संदेश, इ. वृत्तपत्रे होती. मात्र आंबेडकरांच्या चळवळीचा आंदोलनाचा कुठेही या वृत्तपत्रात उल्लेख येत नव्हता. त्यांच्या प्रबोधनाचे किंवा सामाजिक चळवळीच्या प्रयत्नाचे विवेचन न करता त्यावेळीही वृत्तपत्रानी दलिताबरोबर जाणिवपूर्वक पक्षपातीपणा करीत असल्याचे अनेक पुरावे आढळतात. उलट डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर टिका करीत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे त्या काळात प्रचंड म्हणजे ५०-५० हजाराच्या लोकासमोर मोठमोठया सभा होत होत्या. तरीही एकही

ओळीचे वृत्तपत्रे दखल घेत नव्हते म्हणूनच त्यांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द ही वृत्तपत्रे गरज म्हणून सुरु केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेला सुरु केली. तो काळ अतिशय कठीण होता. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांना जातीच्या, साक्षरतेच्या पैशाच्या स्पर्धेमध्ये ते सर्वात प्रतिकुल राहिले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते पृथ्वीतलावरील 'माणूस' हा सर्वश्रेष्ठ आहे. त्यानेच सुर्याला सुर्य, चंद्राला चंद्र, पृथ्वीला पृथ्वी , असे म्हटले. मानवता, माणुसकी, प्रेम, करुणा, आपुलकी आणि एक नव्या समता सृष्टीचे स्वप्न मानवाला दिले आहे. प्रत्येक मानवी व्यक्ती म्हणून सर्वांना समान नैसर्गिक हक्क मिळाले. तरच समता, मानवी मुल्ये, स्वाभिमान, स्वातंत्र्य, बंधुत्व, लोकशाही या तत्वाचा विचार होऊ शकतो. त्यांनी वैज्ञानिकतेच्या दृष्टिकोनातून स्वतःकडे समाजाकडे,राष्ट्राकडे आणि भौतिक घडामोडीकडे डोळस नजनेने पाहूनच वैचारिक बदल स्विकारल्याशिवाय सांस्कृतिक बदल शक्य नाही याची जाणीव करुन दिली आहे. आपल्या प्रगल्भ विचार धारेतून भारतीय समाजाचे वास्तव दर्शन घडवून सामाजिक परिस्थितीची जाणिव करुन देण्यासाठी आपल्या पत्रकारितेचा उपयोग केला. समाजातील खरी वस्तुस्थिती व सामाजिक भूमिका मांडून व्यक्ती, समाज यासाठी बहुमोल मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या वृत्तपत्रांचा वापर केला. त्यांच्या विचारधारांची जाणीव एखाद्या समाजाला बांधून ठेवणे म्हणजे मानव कल्याणाचा मार्ग बंद करण्यासारखे आहे. मानवाच्या जीवनात परिवर्तनासाठी त्यांनी वृत्तपत्रांचा मार्ग अवंलबलेला होता.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रासंबंधीची भूमिका :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकाच वेळी अनेक पातळयावर लढत असतानाच पत्रकारितेकडे त्यांनी प्रवेश केला. त्यावेळी पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारला. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समर्पक उत्तर दिले की, " या समाजामध्ये जन्माला येणाऱ्या हर एक मानसावर आपल्या समाजाने आपल्यावर केलेल्या ऋणातून काही ऋण फेडण्याची जबाबदारी असते. ती फेडण्यासाठी मी पत्रकारिता स्विकारलेली आहे." असे अत्यंत व्यापक समर्पक उत्तर दिले आणि दुसरे म्हणजे संपूर्ण समाज बदलण्याचे ध्येय त्यांच्या पत्रकारितेमध्ये होते. हा समाज बदलातून नविन समाज घडविण्याचा त्यांचा मानस होता. असे व्यापक उद्दिष्ट त्यांचे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, आमच्या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायाविरुध्द उपाय सूचविण्यासाठी त्यांची सत्तेत भागीदारी, प्रगती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या अर्थाने चर्चा करण्यासाठी वृत्तपत्रासारखी अन्य कोणतीही भूमी नाही. वृत्तपत्रेही समाजाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब त्यातून स्पष्ट दिसते म्हणून तेथील सामाजिक प्रश्न, सामाजिक बांधिलकी वृत्तपत्राला दिसली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता अन्यायाला वाचा फोडणारी होती. समाजाची होणारी पिळवणूक लोकांसमोर आणून लोकांमध्ये चेतना निर्माण करणारी होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे उत्तम प्रतीचे मराठी लिहित होते. मराठी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून केलेले लिखाण हे सर्व सामान्याला समजेल अशा भाषेत लिहित होते. अत्यंत श्रेष्ठ दर्जाची भाषाशैली त्यांनी वापरलेली होती. पत्रकारिता हे लोक शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रभावी पणे त्यांनी वापरलेले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी होते. त्यांची पत्रकारिता हा त्यातीलच एक पैलू होता. त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून नैतिकता सांभाळली पाहिजे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते पत्रकाराने स्वतः तावून, सुलाखून निघालेच तर लिखाणात एक धार येईल, एक धडाडी निर्माण होईल, आत्मविश्वास निर्माण होईल आणि तोच तुमचे दबावाचे काम करेल मात्र सामाजिक बांधीलकी पासून दूर जाता कामा नये. यातूनच आत्मविश्वास, विश्वासर्हता , पारदर्शकता, प्रामाणिकपणा दिसला तरच विषयाला दर्जा प्राप्त होईल. पत्रकाराने सामाजिक बांधीलकी जपत, परिश्रम, हुशारी आणि दूरदृष्टी ठेवली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते पत्रकारितेमध्ये दलित स्त्रिया, वंचित घटक, बहुजन समाज, श्रीमंत वर्ग इ.सर्व समाजाचे चित्रण करणारी असली पाहिजे. त्यांनी आपल्या वृत्तपत्रात या समस्या बरोबरच त्या काळातील गिरणाच्या राष्ट्रीय करणाचा प्रश्न, कोळशाच्या खणी कामगाराचा प्रश्नही मांडलेला होता. हे प्रश्न मांडताना सामाजिक प्रश्नाचे भान पत्रकाराने ठेवले पाहिजे, सामाजिक घटकांचा अभ्यास करणे, गरजेचे आहे. असा संदेश त्यांनी आपल्या मुकनायक, जनता, बहिष्कृत भारत, प्रबुध्द भारत या वृत्तपत्रातून दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेमध्ये ज्या प्रमाणे संपादकाला स्वातंत्र्य दिले असते. तेवढेच स्वातंत्र्य पेपर वाचणाऱ्या वाचकाला दिलेले होते. ते म्हणजे त्यांच्या सर्व वृत्तपत्रांत जी वाचकाची पत्रे बाबासाहेबांच्या विचारावर टिका करणारी होती. ती पत्रेही जशीच्या तशी आपल्या वृत्तपत्रातून छापून त्यांचे समर्पक उत्तर म्हणून आपले मतही छापत होते. त्यांच्या वृत्तपत्रांचा वाचक हळूहळू बातमीदार झाल्याचेही उदाहरणे पाहावयास मिळतात. हाच बाबासाहेबावर प्रेम करणारा बातमीदार पुढील काळात त्यांचा सक्रिय कार्यकर्ता बनत असे. हा कार्यकर्ता आपल्या आजूबाजूला जे घडेल ते लिहून वार्तापत्राकडे पाठवित असे. त्यामुळेच त्यांच्या वृत्तपत्रात समाजाचे समकालीन घटनाबरोबरच समाजाचे परिपूर्ण स्वरुपात दर्शन घडत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना स्वप्नातला भारत पहावयाचा होता. त्यासाठी दलित स्त्रियाचांही विकास होणे गरजेचे आहे. अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी स्वतः आत्मसन्मानाने समाज जागविला. ती सामाजिक बांधीलकी मानली पाहिजे. त्यांनी पत्रकारिता करताना समाजशास्त्र व नितीशास्त्र यांची सांगड घालूनच आपली पत्रकारिता विकसित केली. त्यांच्या पत्राकारितेमध्ये सामाजिक बांधीलकी, सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय या तत्वावर आधारीत जागृती निर्माण करणारी आधारभूत घटक समाविष्ट होते.

**डॉ.बाबासाहेब यांची वृत्तपत्रे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२० पासूनच सुरु केली असली तरी त्यापत्रकारितेचे धागेदोरे १९१३ पासूनच पाहावयास मिळतात. १९१३ ला डॉ.बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत असताना पाठ विलेल्या पत्रातून संपूर्ण सामाजिक चळवळीचे मुद्दे आलेले पहावयास मिळतात. समाजाच्या शेवटच्या तळातील माणून शिकला पाहिजे. हा मुद्दा तसेच शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रश्न इ. अनेक मुद्दे पहावयास मिळतात. १९२० ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुकनायक वृत्तपत्रे सुरु केले. कारण बाबासाहेबांना चळवळीचे व्यासपीठ हवे होते. बहिष्कृत प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी आपल्या चळवळीच्या मुखपत्राची गरज त्यांना जाणवत होती. म्हणूनच त्यांनी मुकनायक हे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राला १९२३ पर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी मदत करुन हे वृत्तपत्र चालविले. या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, इंग्लड, अमेरिका येथे शिक्षणासाठी गेले असतानाही सतत कार्यकर्त्यांना सूचना देत होते. या काळात समाजाला घडविणे, बौध्दिक विचार वाढविणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट होती. स्वतः लिखाण करता करता, स्वतः शिक्षित होत असताना समाजाला शिक्षण दिले जात होते. यातूनच लोक शिक्षकाची भूमिका, समाज पुरुषांची भूमिका अतिशयक वेगाने वाढलेली पहावयास मिळते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुकनायक हे नाव अत्यंत अचूकपणे दिलेले होते. मुकनायक मराठीमध्ये अन्य कोणत्याही भाषेमध्येही नियतकालिकेला, अनियमित कालिकेला सुचलेले आढळत नाही. जो समाज इथल्या व्यवस्थेने कायम मुका झालेला आहे. तो मुका झाल्यामुळे आपली मने व्यक्त करु शकत नाही, स्वतःला व्यक्त करु शकत नसल्यामुळे आपले अन्याय, अत्याचार सांगू शकत नाही. तो काहीच करु शकत नाही, त्याला या संस्कृतीने, व्यवस्थेने, जातीने, धर्माने आणि देवाने मुका बनविलेला आहे. अशा मुक्याचा नायक या देशात पहिल्यादांच वृत्तपत्राच्या रुपाने जागा झाला आहे. तो मुकनायक होय. या मागची व्यापक भूमिकाही समजून घ्यायला पाहिजे. बहिष्कृत भारत हे नाव आणि त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारिता सुरु करण्याच्या काळात बहुजन समाजाच्या शिक्षणाचे प्रमाण देखील अत्यंत अल्प होते. वाचणारा वर्ग अत्यल्प म्हणून तो वाचायला पाहिजे, म्हणून शिक्षणाचे महत्व पटवून दयायला सुरुवात केली. शिक्षण हेच गुलामी नष्ट करण्याचे साधन आहे. याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना होती. डॉ.बाबासाहेबांनी मुकनायक या वृत्तपत्रात दोन स्त्रियांची पत्रे प्रसिध्द करुन मुकनायक मध्ये स्त्रियांचाही सहभाग मुद्दामपणे केलेला होता. त्या अस्पृश्य गरीब होत्या. त्या भाषेपासून, विचारापासून, शब्दापासून खूपच दूर होत्या परंतू, त्यांच्या मनातील विचार अनेकांनी वाचावे. हाच त्यांचा खरा हेतू होता. डॉ.बाबासाहेबांनी मुकनायक हे एकमेव वृत्तपत्र स्वतःच्या संपादनाखाली सुरु केले. ते लौकिक अर्थानेच संपादक होते. त्यांचे समता हे वृत्तपत्र दलितेत्तरांच्या प्रोत्साहनातून सुरु झाले. मात्र याचे नेतृत्वही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीच केले. १९३० ला बहिष्कृत भारत याचे नाव बदलून जनता हे वृत्तपत्र सुरु केले. या बहिष्कृत भारत वृत्तपत्रामध्ये चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या वेळी तीन अप्रतिम आणि अत्यंत दर्जेदार लेखही लिहिलेले होते. त्यानंतरचे जनता हे वृत्तपत्र १९३० ते १९५६ पर्यंत चालविले. १९५६ ला जनता या वृत्तपत्राचे प्रबुध्द भारत असे रुपांतर करण्यात आले. मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता या नियतकालिकामधून बाबासाहेबांनी अग्रलेख, स्फुटलेख, आणि पत्रे लिहिली हे लिखाण प्रास्ताविकता, सहजता आणि ताजेपणा हे गुण दर्शवितात. हे लेखनशैलीत विशेषतत्वाने जाणवतात. त्यात कुठेही निर्जीवपणा नाही सर्व लेखन सजीव, रसरशीत आणि जोमदार स्वरुपात आहे. या तील आशय, अभिव्यक्ती आणि शैली या तीनही अंगाने त्यांच्या पत्रकारितेचा विचार करता येईल.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्रातून मांडलेले सामाजिक प्रश्न :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सर्वच वृत्तपत्रातून सामाजिक बांधीलकी जपत नैतिक मुल्यांच्या आधारे समाजातील सामाजिक प्रश्न अंधश्रध्दा, कर्मकांड यांच्या विरोधात आवाज उठविलेला दिसतो. १६ ऑगस्ट १९२९ ला कुलाबा समाचार नावाच्या महत्वाच्या वृत्तपत्रात पेण येथील विटया महाराला साप चावला त्यावेळी त्याला औषधोपचारासाठी दवाखान्यात न नेता मांत्रिकाकडे नेले या मांत्रिकाने त्याला जंगलातील साप चांभार जातीचा असून तोच त्याला चावला. अशी बातमी दिली. ही बातमी डॉ.बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांत आहे तशी छापून त्याखालील वैज्ञानिक वैद्यकीय भूमिका पुराव्यानिशी मांडली आणि समाजातील अंधश्रध्देवर मार्मिकपणे लिखाण केले. १९३० च्या गोलमेज परिषदेतही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक प्रश्न मांडलेले होते. यावरुन आपल्या समाजातील सामाजिक प्रश्न परदेशात गेल्यावरही पत्रे पाठवून सोडविण्याचा प्रयत्न करीत होते. १९३६च्या ला बाबासाहेबांनी देवदासी व वैश्या यांच्यासाठी सभा भरवून त्यांचे प्रश्न वृत्तपत्रातून मांडले व त्यांना सामाजिक स्तरांचा आधार, कायदयांचा आधार, लेखणीचा आधार दिला पाहिजे अशी त्यांनी भूमिका घेत आपले मत वृत्तपत्रांत मांडले या स्त्रियांनी स्वातंत्र, समता, न्यायाचा शिस्तीचा मार्ग स्विकारावा असा विचार वृत्तपत्रातून मांडून त्यांनी मानव जातीच्या उध्दारासाठी लेखन केलेले पहावयास मिळते. मुंबईमध्ये कर्नाटकातून आलेल्या अल्पवयीन मुलीचे लग्ने मारुती बरोबर झाल्याचे एका कार्यकर्त्याने पत्र पाठवले. मुळातच मारुती हा ब्रम्हचारी आहे तरीही ब्रम्हचारी मारुतीबरोबर दोन अल्पवयीन दोन दलित मुलींची लग्न होतात ही बाब या कार्यकर्त्याने पोलीसांना दाखवून त्याबद्दल तक्रारही दिली म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा कार्यकर्ता एकाच वेळी पत्रकाराची, अंधश्रध्दा निर्मूलनाची कामे करु लागलेला होता. त्यांनी देविदासीचा प्रश्न , मुरळीचा प्रश्न विविध जातीतील स्त्रियांचा प्रश्न इत्यादीला पहिल्या पानावर प्रसिध्दी दिली. त्यामुळे अस्पृश्य

समाजाच्या स्त्रियांना देवाच्या नावावर सोडले जाते. त्यांना नव्या विचाराची जाण निर्माण करण्याचे काम या वृत्तपत्राने केलेले होते. बहिष्कृत भारत, मुकनायक या वृत्तपत्रात अनेक सामाजिक प्रश्न, अंधश्रध्देचे प्रश्न कर्मकांड इ. मानले जात होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जुलै १९४५ ला स्त्रियांसंबंधी झपाटयाने संख्या कमी होत आहे. या समाजासमोर चिंतेचा विषय आहे. या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे हक्क या सबंधीचा हक्क मांडला त्यात ते म्हणतात की, कोणत्याही देशाची प्रगती समाजाची प्रगती स्त्रियांची प्रगती यावरुनच मोजली पाहिजे. हा नवा मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून दिला होता. हा संदेश चळवळीतील लोकांसमोर मांडून ते एक प्रकारे सामाजिक बांधीलकीची जाणीव करुन दिलेली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी अधिक जागृत असलेले पहावयास मिळतात. ते स्त्रियांना म्हणतात की, लग्न करण्याची घाई करु नका, आणि जे लग्न करतील त्यांना सांगितले की, या देशामध्ये जास्त मुले जन्माला घालणे हा राष्ट्रीय गुन्हा आहे या दृष्टिने त्याकाळात इतर कोणाचेही कुटूंब नियोजनाकडे लक्ष नव्हते. त्यावेळी डॉ.बाबासाहेबांनी कुटूंब नियोजनाचा ज्वलंत प्रश्न समाजापुढे ठेवलेला होता. स्त्रियांना समान हक्क देण्यासाठी ते म्हणतात की, बायकांनी आपल्या नवऱ्याला सांगावे की, "मी तुमची गुलाम नाही, तुमच्या बरोबरीची आहे , मी तुमची मैत्रिण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून अनेक सामाजिक प्रश्न मांडून त्यांचे मार्मिकपणे उत्तर दिलेले पहावयास मिळते ज्या माध्यमातून सामाजिक बांधीलकी राखली जाईल आणि समाजाच्या प्रगतीसाठी अडसर निर्माण होणाऱ्या कर्मकांड, अंध्दश्रध्दा यांच्या विरोधात आपले विचार मांडून त्या घटनेला एक वैज्ञानिक, तार्किक आधार दिलेला पहावयास मिळतो. त्यांची ही पत्रकारिता समाजासमोर आदर्श निर्माण करणारी होती.

**लोबल जर्नालिझम-डॉ.बाबासाहेब आंबेडकर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक किर्तिचे पत्रकार होते कारण, त्यांच्या नियतकालिकामधून आपल्या प्रदेशाची, आपल्या देशाची, आपल्या व्यवस्थेची जेवढी चर्चा केलेली होती. तेवढी चर्चा जगातील विविध प्रश्नासंबंधी केलेली होती. या अर्थाने त्यांना " ग्लोबल जर्नालिझम " असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्या पत्रकारितेमध्ये मार्क्सवाद, गुलामांचा प्रश्न, राऊंडटेबल कॉन्फरन्स, इंग्लड व जर्मनीतील राजकारण, अमेरिकेचे राजकारण तेथील समाजसुधारकांच्या लढाय्या, विचारवंत, शिक्षण इ.अनेक जागतिक प्रश्न आपल्या वृत्तपत्रांत मांडलेले पहावयास मिळतात. एका अर्थाने त्यांची व्यापक पत्रकारिता सातासमुद्रापलिकडे गेलेली होती. त्यांच्या मुकनायक या वृत्तपत्रांत गल्लीतील प्रश्नांपासून जगातील आंतरराष्ट्रीय प्रश्नापर्यंत अनेक घटक पहावयास मिळतात.

**निष्कर्ष :**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एका फार मोठया जनसमुदायाला वृत्तपत्राच्या माध्यमातून ज्ञानमार्ग दाखविला.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेमध्ये सामाजिक बांधीलकी व नैतिकता याचा आधार घेतला होता.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेमध्ये सामान्य माणसाच्या भाषेत त्यांना समजेल अशी उदाहरणे देवून जागृती केली होती.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वेगवेगळया आंदोलनांची भूमिका आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेत अत्यंत प्रभावीपणे मांडलेली होती.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता समाजात जो पर्यंत अंधश्रध्दा, जातीय व्यवस्था, स्त्रियांचे प्रश्न आहेत. तोपर्यंत मार्गदर्शक व व्यापक अर्थाने उपयोगी पडणारी आहे.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता माणसांच्या गावांनी गजबजलेल्या अशा समाज, स्वातंत्र्य, समता, बंधुता इ. ला मानणारा समाज निर्माण करणारी होती.

७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता फक्त दलितापुरतीच नसून जात, प्रदेश, लिंग, भाषा ओलांडून जाणारी व्यापक स्वरुपाची होती. आणि समाजाला मार्ग दाखविणारी होती.

८) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकरिता ही समग्र मानवी जीवनाच्या मुळाशी जाणारी नव्या समाजाचे स्वप्न पाहणारी होती.

९) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही सकस पत्रकारिता, त्यागातून आलेली पत्रकारिता, माणसाच्या आतील व बाहेरील विचार करणारी पत्रकारिता होती, तिला सशक्त व विज्ञाननिष्ठ आधार होता.

१०) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता त्यागाचा आणि वैचारिक अधिष्ठानाची अनुभूती होती. दलित, उपेक्षित व नाही रे समाजासाठी जागृती करणारी होती.